▶ वर्ष–३
■ अंक–३२

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

# ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प, करवाढ व दरवाढ नाही

## दिवा व मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था

## दिवा प्रभाग समिती हद्दीत मल निसारणप्रकल्प



ठाणे : कोणतीही करवाढ नसलेला तरीही महसुली खर्चावर नियंत्रण, महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष देणारा काटकसरीचा सन २०२३– २०२४ चा सुधारित ५९८८ कोटी ०९लक्ष रूपयांचा तर सन २०२४–२०२५ सालचा ५०२५ कोटी ०१ लक्ष रूपयांचा मूळ अर्थसंकल्प आज महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सादर करीत मंजूर केला.




- मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे अभियान
- मुख्यमंत्री मातृत्व सुरक्षा योजना
- संपूर्णत: नवीन कचरा संकलन यंत्रणा, शून्य कचरा मोहिम
- महिला विषयक विशेष परिवहन सेवा
- महिला बचत गटांना शून्य व्याज दराने कर्ज योजना
- ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा
- मूकबधीर बालक मुक्त ठाणे अभियान
- सी.डी. देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची नवीन इमारत व वसतीगृह
- धर्मवीर आनंद दिघे स्मारक
- प्रशासकीय कामकाजात सुधारणा

(सविस्तर अर्थसंकल्प ४–५ वर)

### दिवा व मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत वितरण व्यवस्था

दिवा व मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा (रिमॉडेलिंग) व नव्याने जलकुंभ बांधणेचे काम हाती घेण्यात आले. सदरचे काम "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान" या योजनेअंतर्गत सुरु आहे.

सदर प्रकल्पांतर्गत एकूण १३.०१६ कि.मी. लांबीची मुख्य जलवाहिनी टाकणे, ९९.१७२ कि.मी. लांबीची वितरण जलवाहिनी टाकणे व १७ जलकुंभ बांधणेच्या कामाचा समावेश आहे. त्यापैकी एकूण ९.०५७ कि.मी. लांबीची मुख्य जलवाहिनी व ७४.९८६ कि.मी. लांबीची वितरण जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. कौसा हॉस्पीटल मागील भूखंडावर दोन जलकुंभ बांधण्याचे कामास सुरुवात करण्यात आली आहे. सदर कामावर आजपर्यंत रु.१६५ कोटी ४० लक्ष खर्च झालेला आहे.

सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ७०% असून आर्थिक प्रगती ६६% आहे. सदर प्रकल्प माहे मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### अमृत योजना –२ मलनि:सारण प्रकल्प

महानगरपालिकेमार्फत ठाणे शहरातील मलनि:सारण वाहिन्या, पंपिंग स्टेशन, मलप्रक्रिया केंद्र इ. सह मलनि:सारण व्यवस्था यापुर्वी हाती घेऊन पूर्ण केलेली आहे. दिवा प्रभाग समिती हद्दीत मलनि:सारण व्यवस्था राबविण्याकरिता शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर प्रकल्पास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिवा प्रभाग समिती क्षेत्रासाठी मलनि:सारण व्यवस्था प्रकल्प, हाऊस कनेक्शन व मलप्रक्रिया केंद्रासह हाती घेण्याचे नियोजन आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४
पान : २
www.diwanews.com





# दिव्यात इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिरात महाशिवरात्री उत्सव उत्साहात संपन्न



**दिवा :-** दिव्यात इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिरात मागील ३६ वर्षांपासूनसुरु असलेला महाशिवरात्रीचा उत्सव यंदाही उत्साहात संपन्न झाला. १९८८ मध्ये इच्छतेश्वर शिवशक्ती मंदिराची स्थापना दिवा गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ ब्रम्हा पाटील यांनी केली असून हे शिवशक्ती मंदिर परिसरात भाविकांसाठी श्रद्धेचे स्थान बनले आहे. महाशिवरात्री निमित्त मंदिरात बालोपासना, ज्ञानाई हरिपाठ मंडळ- आगासन यांचेभजन, संत श्रीपाददास ह.भ.प.श्री. नारायण महाराज भोईर- दिवा यांचे भजन,संत श्रीपाददास .ह. भ. प. श्री. डॉ. कुणाल म हाराज म्हात्रे डोंबिवली यांचे भजन, परमपूज्य कलावती आई यांचे भजन, महाआरती, श्री. ठाणेश्वर भजन मंडळ- (दिवा) यांचे भजन व रात्री १२.०० वाजता शिव पालखी काढण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भंडारा व महाप्रसादाचाचे आयोजन करण्यात आले . पहाटे पासूनच भक्त या मंदिरात दर्शनासाठी रांगा लावत असल्यामुळे त्यांच्यासाठी चहा व अल्पोपहारची सोय मंदीर समितीचे अध्यक्ष चरण पाटील यांच्या तर्फे दरवर्षी केली जाते. या महाशिवरात्री निमित्त शिवशक्ती मित्र मंडळ, दिवा फाऊंडेशन, दिवा ग्रामस्थ सह शेकडो स्थानिक रहिवाशी यांनी दिवसरात्र नियोजन केले .

# अपघात टाळण्यासाठी दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांना वेगमर्यादेचे फलक लावा

## ठाकरेंच्या शिवसेनेच्या ज्योती पाटील यांची मागणी



**दिवा:-** वाढते अपघात लक्षात घेता दिवा शहरातील रस्त्यांना दिशादर्शक व वेगमर्यादेचे फलक लावण्यात यावेत अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी केली आहे.

दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांना अद्यापही दिशादर्शक व वेगमर्यादेचे फलक लावण्यात आलेले नाहीत. म ुंब्रादेवी-दातिवली रोड,दिवा स्टेशन ते आगासन मुख्य रस्ता, दिवा स्टेशन ते शीळ रोड या प्रमुख रस्त्यांना वेगमर्यादेचे फलक लावण्याची गरज असल्याचे मत ज्योती पाटील यांनी व्यक्त केले आहे.मागील काही दिवसांपासून दिवा शहरात रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांच्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे. वाहने रस्त्याने वेगाने चालवणाऱ्यांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात येतो. म हापालिकेमार्फत रस्त्याला स्पीड बेकर लावण्याचे काम सुरू आहे, मात्र त्याचबरोबर दिवा शहरातील सर्व रस्त्यांना वेगमर्यादेचे फलक लावण्यात यावेत व त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात यावेत अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669



# मुंब्रादेवी कॉलनी परिसरातील पाणीटंचाई व इतर समस्यांच्या विरोधात ठाकरेंची शिवसेना निषेध आंदोलन करणार – रोहिदास मुंडे



**दिवा :– मुंब्रा देवी कॉलनीतील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, मात्र या भागात प्रचंड समस्या असून मागील दहा वर्षात भीषण पाणीटंचाईचा सामना मुंब्रादेवी कॉलनीतील रहिवासी करत आहेत. या समस्यांना वाचा फोडण्यासाठी ठाकरेंच्या शिवसेनेमार्फत निषेध आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती ठाकरेंच्या शिवसेनेचे शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी दिली आहे.**

मुंब्रा देवी कॉलनी परिसरातील नागरिकांना प्रचंड पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. या भागातील नागरिकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागते. टँकरने पाणीपुरवठा होत असलेल्या नागरिकांचे आर्थिक गणित मागील काही वर्षापासून बिघडलेले आहे. नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. दुसरीकडे या भागात ड्रेनेज समस्या मोठ्या प्रमाणात असून कचऱ्याची समस्या देखील मुंब्रा देवी कॉलनी परिसरात मोठ्या प्रमाणात आहे. मौसम थिएटर ते वारेकर शाळा या भागात फुटपाथ वरून चालताना नागरिकांना दुखापती झाल्याच्या घटना घडल्या आहेत. गटारांची झाकणे तुटलेली आहेत. त्याचबरोबर फुटपाथ हे फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने नागरिकांना रस्त्याच्या मधून चालावे लागते यामुळे अपघातांचा धोका निर्माण होतो. या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी व महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मुंब्रा देवी कॉलनी परिसरात निषेध आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती मुंडे यांनी दिली आहे. मुंब्रा देवी कॉलनी परिसरातील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कटिबद्ध असल्याचे मुंडे यांनी सांगितले. जिथे नागरिकांवर अन्याय होत असेल तिथे शिवसेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील असे मत रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

## शिवसेना ठाकरे गटातर्फे दातिवली येथे शिबिराचे आयोजन



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने दातिवली येथे आधार कार्ड बनवणे आधार कार्ड मोबाईल नंबर लिंक करणे पाच वर्ष आतील मुलांचे मोफत आधार कार्ड काढून देणे नवीन मतदार नोंदणी याबाबतचे शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी जागतिक महिला दिनानिमित्ताने महिलांना पुष्प व रुमाल देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन कल्याण ग्रामीण विधानसभा संघटिका योगिता नाईक व हेमंत नाईक यांच्या वतीने करण्यात आले होते.



दिव्यात मुंब्रादेवी कॉलनीतील भोलेनाथ कॉम्प्लेक्स को.ऑप हौ. सोसायटीच्या वतीने सत्यनारायण पूजा आणि भंडारा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी नगरसेवक शैलेश पाटील, कैलेश पाटील, अनेक मान्यवर यांनी ही उपस्थित होते. हेमंत शेठ उमेश यादव अरविंद राय गणेश इंगळे बेबी बच्चन पाथरे, रमेश विश्वकर्मा, नितीन पोल, यांच्यासह सहकार्यामुळे कार्यक्रम संपन्न झाला.

## रमाकांत मढवी यांच्या हस्ते बी आर नगर येथील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन



**दिवा:**–महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून,तसेच खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या निधीतून दिवा बी.आर.नगर येथील ऑक्सफर्ड स्कुल पासून ते दिवा शिळ रोड समोरील वैभव ढाबा पर्यंत कॉँक्रिटीकरण पद्धतीने रस्ता बनविण्याच्या कामाचे भूमिपूजन रविवारी करण्यात आले.

ठाणे महापालिकेचे माजी उपमहापौर शिवसेना शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या हस्ते भूमिपूजन करून कामाचा शुभारंभ करण्यात करण्यात आला. यावेळी शिवसेना दिवा उपशहरप्रमुख माजी नगरसेवक शैलेश पाटील, मा.नगरसेविका,सौ.दिपाली भगत,अमर पाटील,आदेश भगत,गुरुनाथ पाटील निलेश पाटील,भालचंद्र भगत, प्रदीप पाटील, सूर्यकांत कदम, समीर मोरे, कार्यकर्ते व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४
पान : ४
www.diwanews.com




# कोणतीही करवाढ व दरवाढ नसलेला काटकसरीचा ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प

## प्रशासक तथा महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी मांडला अर्थसंकल्प

ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाच्या सर्वच बाबींचा अतिशय काळजीपूर्वक विचार करुन प्रत्यक्ष प्राप्त होणा-या एकूण उत्पन्नाचा प्रामुख्याने विचार विनिमय करुनच हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, खर्चामध्ये वित्तीय शिस्त, अनावश्यक महसुली खर्चात कपात, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण या त्रिसुत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी, भांडवली कामातंर्गत घेतलेली कामे पूर्ण करण्याचे नियोजन, प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा, प्राप्त अनुदानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन, कामांचा दर्जा उत्तम रहावे याकडे विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

सन २०२३-२४ मध्ये रु. ४३७० कोटी रकमेचा अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. यामध्ये पाणीपुरवठा आकार, अग्निशमन दल, जाहिरात, स्थावर मालमत्ता इत्यादी विभागांच्या उत्पन्नात घट येत असली तरी शहर विकास विभागाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यामुळे महसूली उत्पन्न रु. ३१६० कोटी १६ लक्ष ऐवजी रु ३०९२ कोटी ३९ लक्ष सुधारित करण्यात आले आहे. महापालिकेस प्राप्त होणाऱ्या अनुदानाचा विचार करता मूळ अर्थसंकल्पात अपेक्षित केलेल्या रु. ४६० कोटी ०५ लक्ष अनुदानामध्ये रु. ६९७ कोटी ९८ लक्ष वाढ होत असून सुधारित अर्थसंकल्पात अनुदानापोटी रु. ११५८ कोटी ०३ लक्ष अनुदान अपेक्षित केले आहे व डिसेंबर २०२३ अखेर रु. ८९८ कोटी २९ लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त झालेल्या अनुदानातील अखर्चित रकमा २०२३-२४ च्या आरंभिच्या शिल्लकेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. खर्च बाजूस सन २०२३-२४ मध्ये महसुली खर्च रु. २७०८ कोटी ८३ लक्ष अपेक्षित केला होता, तो सुधारित अंदाजपत्रकात रु. २६७२ कोटी ७९ लक्ष अपेक्षित असून भांडवली खर्च रु. १६६० कोटी ९१ लक्ष ऐवजी भांडवली अनुदानात वाढ झाल्याने तो रु. २०४९ कोटी ४३ लक्ष सुधारित करण्यात आला असल्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

### महापालिका उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत

**मालमत्ता कर :**

मालमत्ता कर व फी पासून सन २०२३-२४ मध्ये रु. ७६१ कोटी ७२ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. डिसेंबर २०२३ अखेरचे उत्पन्न रु.४८१ कोटी ३६ लक्ष विचारात घेवून मालमत्ता करापासून रु.७३८ कोटी ७१ लक्ष सुधारित अंदाज करण्यात येत आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके दि.०१ एप्रिल २०२३ च्या पहाटे जनरेट करुन करदात्यांना देयके व कर भरण्याच्या लिंकसह एसएमएसद्वारे पाठविण्यात आली. महानगरपालिकेकडून प्रथमच आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसच मालमत्ता कराची देयके देण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. दि.०१ एप्रिल२०२३ रोजी पहिल्या दिवशी रु.१.९३ कोटी तर एप्रिल २०२३ महिन्यात रु.६५.७९ कोटी इतका मालमत्ता कर जमा झाला आहे. पहिल्या सहामाही सोबत दुसऱ्या सहामाहीचा कर भरणाऱ्या करदात्यांना सवलत / सूट देण्यात आली आहे. सन २०२३-२४ मध्ये उपरोक्त सवलतीचा २,६०,९३७ इतक्या करदात्यांनी लाभ घेतला आहे. करदात्यांना त्यांच्या करावरील कराधान नियम ४१ (१) अन्वये आकारलेल्या मालमत्ता करावरील शास्ती / व्याज माफीची अभय योजना यशस्वीपणे राबविली असून ५९,४५६ करदात्यांनी याचा लाभ घेतला असून सदर अभय योजनेमुळे रु.१६४ कोटी ३७ लक्ष एवढी वसुली झालेली आहे. सन २०२४-२५ मध्ये मालमत्ता कर व फीसह रु.८१९ कोटी ७१ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके वर्षाच्या अगदी सुरुवातीस देण्यात येणार आहेत. जेणेकरून, महापालिकेस आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस कररुपी उत्पन्न मिळेल.

ठाणे महानगरपालिकेच्या कर वसुली विभागांतर्गत मालमत्ता कराच्या महसुली उत्पन्नात वाढ करण्याकरीता पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात येणार आहेत. १) वाढीव मागणी व त्यातून वाढणा-या उत्पन्नातील भागिदारी तत्वावर मालमत्तांचा जी.आय.एस.सर्व्हे व त्यातून उत्पन्न वाढ. २) मालमत्ता कराचा डेटा हा इतर विभागाच्या डेटा सोबत तुलनात्मक पुनर्पडताळणी करणे ( ) प्रस्तावित असून यावरून मालमत्ता कराचा डेटा सुधारित होवून मालमत्ता कराच्या मागणीमध्ये वाढ होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

**विकास व तत्सम शुल्क :**

सन २०२३-२४ मध्ये शहर विकास विभागाकडून विकास व तत्सम शुल्कापोटी रु.५६५ कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते. यामध्ये या आर्थिक वर्षात चांगली वाढ झाली असून शहर विकास विभागाकडून प्राप्त झालेले डिसेंबर २०२३ अखेरचे उत्पन्न रक्कम रु.५५४ कोटी ५१ लक्ष विचारात घेऊन शहर विकास विभागाकडील उत्पन्न रक्कम रु.६६२ कोटी ८६ लक्ष सुधारित करण्यात आले आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.७५० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेले आहे.

**स्थानिक संस्था कर :**

स्थानिक संस्था कर विभागाकडे वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु.१०५७ कोटी ७९ लक्ष , मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.२०० कोटी, स्थानिक संस्था कराची मागील वसुली रु. १० कोटी असे एकूण रु.१२६७ कोटी ७९ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले होते. शासनाकडून वस्तू व सेवाकर अनुदानाची रक्कम नियमितपणे प्राप्त होत असून डिसेंबर २३ अखेर प्रत्यक्षात रु.७९३ कोटी ३५ लक्ष प्राप्त झाले आहेत. परंतु मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अपेक्षित धरलेल्या अनुदानापैकी आतापर्यंत रु.८६ कोटी ५१ लक्ष अनुदान प्राप्त झाले असल्याने मुद्रांक शुल्कापोटी सुधारित अंदाज रु.१७५ कोटी अपेक्षित केले आहे. तसेच स्थानिक संस्था कराच्या मागील थकबाकी वसुलीपोटी अपेक्षित उत्पन्नापैकी डिसेंबर २०२३ अखेर रु. ९ कोटी ५८ लक्ष प्राप्त झाले असल्याने सुधारित अंदाज रु. ११ कोटी ११ लक्ष करण्यात आले आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन स्थानिक संस्था कर विभागाचे सुधारित अंदाज एकूण रु.१२४३ कोटी ९० लक्ष अपेक्षित केले आहेत. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु. ११४२ कोटी ४२ लक्ष , मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु. २०० कोटी, स्थानिक संस्था कराची मागील वसुली रु. ८ कोटी असे एकूण रु.१३५० कोटी ४२ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

**पाणी पुरवठा आकार :**

पाणी पुरवठा आकारासाठी सन २०२३-२४ मध्ये रु. २२५ कोटी उत्पन्न अपेक्षित होते.यामध्ये मोठया प्रमाणात घट दिसून येत आहे. पाणी पुरवठा आकाराचे डिसेंबर २०२३ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न रु.६३ कोटी ७६ लक्ष विचारात घेता सुधारित अंदाज रु. १५० कोटी अपेक्षित केले असून सन २०२४-२५ मध्ये रु. २२५कोटी उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**अग्निशमन दल :**

अग्निशमन विभागाकडून मूळ अंदाज रु. १३२ कोटी ०३ लक्ष अपेक्षित केले होते. शासनाने फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस व फायर प्रिमियम चार्जेस बंद करुन अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी सुरु करण्यात आली असून डिसेंबर २०२३ अखेर प्रत्यक्ष रु. ७३ कोटी ८४ लक्ष प्राप्त झाले असून उत्पन्नामध्ये घट झाली असल्याने रु.१००कोटी सुधारित अंदाज प्रस्तावित केले आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी रु. १००कोटी ०३ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**स्थावर मालमत्ता विभाग :**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात स्थावर मालमत्ता विभागाकडून रु.१९ कोटी ६५ लक्ष अपेक्षित केले होते. डिसेंबर २०२३ अखेर रु.५ कोटी ८० लक्ष प्रत्यक्षात उत्पन्न प्राप्त झाले असल्याने स्थावर मालमत्ता विभागाचे सुधारित अंदाज रु. १४ कोटी ७८ लक्ष अपेक्षित केले आहे. सन २०२४-२५ मध्ये स्थावर मालमत्ता विभागाकडून रु.१२ कोटी १५ लक्ष उत्पन्न अपेक्षित करण्यात आले आहे.

**जाहिरात फी :**

जाहिरात फी पोटी सन २०२३-२४ मध्ये रु. २२ कोटी ३७ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले होते. डिसेंबर २०२३ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न रु. ८ कोटी ४७ लक्ष झाले असल्याने सुधारित अंदाजपत्रकात जाहिरात फी पासून रु.१२कोटी ३५ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले असून सन २०२४-२५ मध्ये रु. २४ कोटी ६२ लक्ष उत्पन्न अंदाजित केले आहे.

**अनुदाने :**

सन २०२३-२४ मध्ये शासनाकडून डिसेंबर २०२३ अखेर रु.९८९कोटी २९ लक्ष लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने पायाभुत सुविधांतर्गत रस्ते विकसन रु. २१९ कोटी ६५ लक्ष , दिवा मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा (रिमॉडेलिंग) व जलकुंभ बांधणे साठी रु.२४०कोटी २९ लक्ष, सार्वजनिक शौचालय बांधकाम व नुतनीकरणापोटी रु.२५कोटी, शहर सौंदर्यीकरणासाठी रु. ३५ कोटी, पंधराव्या वित्त आयोगाकडून रु. ५२ कोटी ८१ लक्ष व पायाभुत सुविधांतर्गत विशेष अनुदानापोटी रु. ३१४ कोटी ५५ लक्ष, अल्पसंख्यांक बहुल विकास निधी पोटी रु. ३ कोटी , कडून मुंबई नागरी पायाभूत सुविधांतर्गत रु. ८ कोटी ३० लक्ष ही अतिरिक्त अनुदाने प्राप्त झाल्याने अंदाजपत्रकात रु. ११५८ कोटी ०३ लक्ष सुधारित उत्पन्न अपेक्षित केले आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी रु.२८४ कोटी ३२ लक्ष अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने पायाभुत सुविधेंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय नुतनीकरण व सुधारणा रु.१० कोटी, एकात्मिक उदयान विकास कार्यक्रम रु.१० कोटी, एकात्मिक स्मशानभुमी नुतनीकरण कार्यक्रम रु.१०कोटी, सार्वजनिक शौचालय बांधकाम व नुतनीकरण रु.३५कोटी, (पान ५ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४
पान : ५

# स्वप्नील घाटकर ठरला 'दिवा सर्वश्रेष्ठ श्री २०२४'




**दिवा :** दिवा शहर अंतर्गत जिम मालक संघटनेच्या विद्यमाने व ठाणे जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटना (हाईट ग्रुप) यांच्या मान्यतेने पहिली दिवा अंतर्गत शरीरसौष्ठव स्पर्धा संपन्न झाली. ही शरीरसौष्ठव स्पर्धा पॉवर झोन फिटनेस, दिवा पूर्वचे संचालक तेजस शंकर भोईर, भूषण जनक म्हात्रे, राजेंद्र सुरेश ठाकूर यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेत ७० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. तर स्पर्धेत दिव्यातील गो जिमच्या स्वप्निल संतोष घाटकरने 'दिवा सर्वश्रेष्ठ श्री २०२४'चा मान पटकावला.

यात दिव्यातील युनिक फिटनेस, फिट ऍण्ड फाईन फिटनेस जिम, श्रीमंत योगी जिम, गो जिम, सॅम फिटनेस, श्री भोईर ब्रदर्स जिम, बिईंग स्ट्रॉंग फिटनेस, फेटल जिम, मसल मंच जिम, सिद्धेश्वर जिम, केव्हीस जिम अशा एकरा जिममधील ७० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. मसल मंच जिमने २५ अधिक गुणांसह सांघिक जेतेपद पटकावले. सॅम फिटनेस जिम २७ वजा गुणांसह दुसऱ्या स्थानी राहिला. स्पर्धेतील सर्वोत्तम शरीरसौष्ठव प्रदर्शक म्हणून मसल मंच जिमच्या शिवा अनिल घोगळेची निवड करण्यात आली. तर सर्वोत्तम शरीरसौष्ठव प्रदर्शक उपविजेता सॅम फिटनेस जिमचा महेंद्र पावसकर ठरला. तसेच पॉवर झोन फिटनेस जिमच्या स्वप्नील बाळकृष्ण काटकर सर्वोत्तम पिळदार शरीरयष्टीचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर सर्वोत्तम पिळदार शरीरयष्टीचा पुरस्कार उपविजेता श्रीमंतयोगी जिमच्या सिध्दांत दळवी झाला. या शरीरसौष्ठव स्पर्धेतील उगवता तारा म्हणून मसल मंच जिमच्या निलेश केवटला पुरस्कार देण्यात आला. या शरीरसौष्ठव स्पर्धेत राष्ट्रीय पंच विनायक केतकर (सचिव) ठाणे जिल्हा हौशी शरीर सौष्ठवं संघटना, संतोष म लबारी - (उपाध्यक्ष) ठाणे जिल्हा हौ. श. सौं. संघटना व सह सचिव महाराष्ट्र राज्य संघटना, राष्ट्रीय पंच व राष्ट्रीय निवेदक तर अशोक मोकाशी राष्ट्रीय पंच (जेष्ठ) लाभले होते.

यावेळी माजी उपमहापौर रमाकांत मढवी, माजी नगरसेवक शैलेश पाटील, अमर पाटी, दिपक जाधव, साबे विभाग प्रमुख निलेश पाटील, दिवा पश्चिम विभाग प्रमुख भालचंद्र भगत, धर्मविर नगर विभाग प्रमुख सचिन चौबे, शंकर भोईर, भूषण म्हात्रे, राजेंद्र ठाकूर, तेजस भोईर उपस्थित होते.

# कोणतीही करवाढ व दरवाढ नसलेला काटकसरीचा ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प

**(पान ४ वरून)**

पंधरावा वित्त आयोग रु. ५ कोटी, पायाभुत सुविधेसाठी रु.५० कोटी, कडून मुंबई नागरी पायाभूत सुविधांतर्गत रु.५ कोटी, अमृत योजना फेज २ साठी रु.१० कोटी व एकात्मिक तलाव संवर्धन व सुशोभीकरण कार्यक्रमांतर्गत रु.१० कोटी, राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रातील ६ तलावांचे संवर्धनासाठी रु.१० कोटी ६२ लक्ष व कोलशेत बसडेपो विकसित करणेसाठी रु.१० कोटी इत्यादींचा समावेश आहे.

**म्युनिसिपल बॉन्ड अथवा कर्ज :**

आजमितीस महापालिकेवर रु. ९३ कोटी ६२ लक्ष कर्ज शिल्लक आहे. केंद्र शासनाने अमृत २ अंतर्गत पाणी पुरवठा विस्तारासाठी रु.३२३ कोटी रकमेचा डि.पी.आर. मंजूर केला असून या अंतर्गत केंद्र शासनाचा २५%, राज्य शासनाचा २५% व महापालिकेचा ५०% हिस्सा असणार आहे. महापालिका हिस्स्याची रक्कम म्युनिसिपल बॉन्ड उभारुन किंवा कर्जाद्वारे उपलब्ध करुन घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी मार्च २०२३ अखेर अखर्चित निधी दि.१.४.२०२३ च्या आरंभिच्या शिल्लकेमध्ये समाविष्ट आहे. सन २०२३-२४ मध्ये केंद्र व राज्य शासनाकडील प्राप्त निधीमधून हाती घेतलेली कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२३-२४ म ध्ये शिल्लक राहणारी अंदाजित अखर्चित रक्कम सन २०२४-२५ च्या आरंभिच्या शिल्लकेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

बहुतांश कुष्ठरोग बाधीत रुग्ण हे आर्थिक दुर्बल घटकातील असून त्यांना विशिष्ठ औषधांची गरज असते. महापालिका हद्दीतील कुष्ठरोग रुग्णांसाठी म ोफत औषधे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात कुष्ठरोग औषधे खरेदी या लेखाशीर्षांतर्गत आवश्यकती तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे हॉस्पीटलचे विस्तारीकरण :**

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचा विस्तारीत भाग म्हणून श्रीनगर, वागळे इस्टेट येथे मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे हॉस्पिटल पी.पी. पी. तत्वावर सुरु करण्यात आले आहे. सदरचे रुग्णालय सुपर स्पेशालिटी सुविधा कॅशलेस असणारे महाराष्ट्रातील पहिले रुग्णालय आहे. सदर रुग्णालयात , , , , , इत्यादी प्रकारच्या शस्त्रक्रिया होतात. रुग्णालय सुरु झाल्यापासून मागील एक ते दिड वर्षात ६ हजार पेक्षा जास्त रुग्णांनी या ठिकाणी उपचार घेतले असून हे सर्व उपचार महात्मा फुले जन आरोग्य या योजनेमधून मोफत घेतले आहेत.

या रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या पाहता, क्षमता वाढविण्यासाठी विस्तारीकरणाची आवश्यकता होती. यासाठी शासनाकडून रु.२० कोटी अनुदान प्राप्त झाले असून रुग्णालयाच्या शेजारची जागा संपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

**मातोश्री इंदिराबाई बाबुराव सरनाईक हॉस्पिटल नळपाडा :**

मौजे नळपाडा येथे १०० खाटांचे अद्ययावत मल्टीस्पेशालिटी, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलकरीता साहित्य खरेदीसाठी पायाभुत सुविधेंतर्गत शासनाकडून रक्कम रु.७ कोटी अनुदान मंजूर झाले असून सदर हॉस्पिटल पी.पी.पी.च्या माध्यमातून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**कौसा हॉस्पीटल कार्यान्वित करणे व कर्करोग उपचार सुविधा निर्माण करणे :**

कौसा येथील १५० खाटांचे स्वांतत्र्य सैनिक हकीम अजमल खान हे रुग्णालय महापालिकेमार्फत पी.पी.पी. तत्वावर चालविणेबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संबंधित कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. या रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी सेवा रुग्णांना दिल्या जाणार आहेत. सदर रुग्णालयामध्ये "महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना" अंतर्गत पिवळे व केशरी शिधापत्रिका धारण करणाऱ्या रुग्णांना मोफत आरोग्य सेवा पुरविली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात "महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना" या मध्ये अपात्र ठरणा-या रुग्णांच्या उपचारापोटी येणारा खर्च महापालिकेमार्फत अदा केला जाणार आहे.

**डायलिसिस केंद्र**

ठाणे महापालिका क्षेत्रात पुढील ठिकाणी डायलिसिस केंद्र सुरु आहेत

१. सी.आर वाडिया आरोग्य केंद्र
२. रोजा गार्डन प्रसूती गृह
३. निर्मलादेवी दिघे कोरस रुग्णालय
४. काशिनाथ घाणेकर डायलिसिस केंद्र
५. कौसा रुग्णालय येथील दहा खाटांचे डायलिसिस केंद्र

कोपरी गाव येथील आरोग्य केंद्रामध्ये पी.पी.पी. तत्त्वावर डायलिसिस केंद्र मे. नाना पालकर स्मृती समिती या संस्थेद्वारे चालविण्यात येत आहे. डायलिसिस केंद्राकरिता आवश्यक असणारी उपकरणे डायलिसिस मशीन संस्थेमार्फत बसविण्यात येणार आहेत. वागळे प्रभाग समिती अंतर्गत माँसाहेब मिनाताई ठाकरे प्रसुतीगृह येथे पी.पी.पी.च्या माध्यमातून डायलिसिस केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि राजीव गांधी वैदयकीय महाविद्यालय अदययावतीकरण: मोफत दहनविधी सुविधा**

**इंग्रजी माध्यमांच्या नवीन शाळा सुरु करणे: :**
**मराठी माध्यमांच्या शाळांचे सक्षमीकरण**
**हरित ठाणे उपक्रम**
**प्रदुषण मुक्त व धूळ मुक्त ठाणे**
**अमृत योजना -२.० पाणी पुरवठा व्यवस्था :**
**दिवा व मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत वितरण व्यवस्था**
**मलनि:सारण योजना**
**अमृत योजना -२ मलनि:सारण प्रकल्प**

महानगरपालिकेमार्फत ठाणे शहरातील मलनि:सारण वाहिन्या, पंपिंग स्टेशन, मलप्रक्रिया केंद्र इ. सह मलनि:सारण व्यवस्था यापुर्वी हाती घेऊन पूर्ण केलेली आहे. दिवा प्रभाग समिती हद्दीत मलनि:सारण व्यवस्था राबविण्याकरिता शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर प्रकल्पास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दिवा प्रभाग समिती क्षेत्रासाठी मलनि:सारण व्यवस्था प्रकल्प, हाऊस कनेक्शन व मलप्रक्रिया केंद्रासह हाती घेण्याचे नियोजन आहे. ठाणे शहर व महाराष्ट्रात आलेल्या आपत्तीच्या वेळी पथक तात्काळ पोहचून आपत्तीच्या प्रसंगी तत्परतेने मदतकार्य करते. ची उपयुक्तता पाहता, यामधील जवानांना सक्षम बनविणे आवश्यक असून याअंतर्गत त्यांच्या फिजीकल फिटनेसकरिता तज्ञ प्रशिक्षक नेमणे व पथकासाठी स्वतंत्र फिटनेस झोन बनविण्याचे विचाराधीन आहे.

या सर्व योजना, अभियान व प्रकल्पांसाठी सन २०२४-२५ मध्ये महसुली खर्च रु.३३४५ कोटी ६६ लक्ष , भांडवली खर्च रु. १६७९ कोटी , अखेरची शिल्लक रु. ३५ लक्षसह एकूण रु.५०२५ कोटी ०१ लक्ष खर्चाचे अंदाज प्रस्तावित करण्यात येत असल्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४



www.diwanews.com

# उक्षीच्या कन्येची महाराष्ट्र पोलीस दलात निवड






## बारावीत ४ वेळा नापास तरीही जिद्दीने मिळवली पोलिसाची नोकरी

स्पेशल रिपोर्ट

▶ एम.एम.काझी

**रत्नागिरी:– रत्नागिरी तालुक्यातील उक्षी सारख्या ग्रामीण भागात गरीब कुटुंबात जन्माला आलेल्या मुलीने, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर राज्य सुरक्षा दलात आपली मोहर उमटवली आहे. अशा या जिद्दी मुलीचं नाव आहे मयुरी जाधव.**

ती सद्या बारामती येथील उपमुख्यालयात कार्यरत आहे. तिने आपल्या कुटुंबाची आणि आपण पोलीस दलात कशाप्रकारे सामील झालो याची निसंकोच कहाणी सांगितली आहे. ती म्हणते की, घरात हलाखीची स्थिती होती. वडील अपंग तरीही जमेल तसे काम करून उदरनिर्वाह करायचे. आई मोलमजुरी करून कसाबसा घराचा डोलारा सांभाळत होती. मयुरी ही नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरी येथून परीक्षा देत होती. मात्र नियती तीची कसोटीच पहात होती. बारावीला चक्क चार वेळा फेल झाली होती. याच कारणही तिने सांगितल आहे.

बारावीला पहिल्या वेळी परीक्षेला बसली तेव्हा मुंबईला आईच मणक्याच ऑपरेशन होत. आई रुग्णालयात ऍडमिट होती आणि त्याच चिंतेत मयुरीने परीक्षा दिली. परिणामी नापासचा रिझल्ट हाती पडला. दुसऱ्या वेळी जुलै दरम्यान पुन्हा परीक्षेला बसली. त्यावेळी आई घरात आजारी. सगळी कामे मयुरी हीलाच करावी लागत होती. अभ्यासाला पुरेसा वेळ देता येत नव्हता.म्हणून यावेळीही ती नापास झाली. मधल्या कालावधीत तिने आता नोकरी करून शिक्षण घ्यायचं ठरवलं. तिसऱ्या वेळी पुन्हा परीक्षेला बसली. अभ्यास सुद्धा केला होता. मात्र इथेही माशी शिंकली. ऐन परीक्षेच्या दिवशी ज्या ठिकाणी नोकरी करत होती त्या मालकानेच परीक्षेला जाऊ दिलं नाही. मयुरीची पुरती निराशा झाली. अशा एक ना अनेक अडचणी ऐन परीक्षेच्या वेळी येत होत्या. आता मात्र तिने निश्चय केला होता की चौथ्या वेळी परीक्षा पास व्हायचं. तिने अभ्यासाला पुन्हा जोमाने सुरुवात केली. अभ्यासाबरोबर ती सकाळी मैत्रिणीबरोबर धावायला जायची. त्यावेळी तिने पोलीस भरतीचा विचार सुद्धा केला नव्हता. दरम्यान यावेळी बारावीचे पेपर सुटतील असे वाटत होते. पण यावेळीही ती नापास झाली.



### पतीमुळे हे शक्य झालं

**मयुरी हिच्याशी संपर्क साधला असता तिने सांगितले, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असते अस म्हणतात पण माझ्या यशाच्या मागे माझे पतीराज आहेत.त्यांच्यामुळे आणि घरातील लोकांच्या पाठिंब्यामुळे मी इथपर्यंत पोहोचू शकले.**

वारंवार अडचणी येत होत्या.

दरम्यानच्या कालावधीत तिने दुसरी नोकरी पत्करली. सकाळी धावत असताना मैत्रिणीने सांगितले की त्या सरांनी अनेकांना पोलीस भरती मध्ये उत्तीर्ण केले. मात्र स्वतः कधीच सिलेक्ट झाले नाही. मैत्रिणीने तिला सांगितले तुझी उंची चांगली आहे. धावतेस ही मग तू सुद्धा पोलीस भरतीला उतर. तिने आपली माहिती सांगितली. आपण बारावीचे पेपर देत आहोत असे सांगितले. त्यावेळी मयुरीच्या मनात पोलीस भरतीचा विचार आला. आपणही पोलीस भरतीला उतरावं. एका मित्राने धावण्याचा सराव करायला सांगितले. सराव करता करता तिला त्याने अभ्यास करायला सांगितले. सराव चालूच होता.

आता कोणत्याही परिस्थितीत बारावी शिकून पोलीस दलात जायचं होत.पाचव्या वेळी पुन्हा परीक्षेला बसली. यावेळी तिने बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाली. तिचा आनंद गगनात मावेना.

दरम्यान पुण्याला कामानिमित्त गेलेली असताना एका मुलाशी मैत्री झाली आणि त्याने तिला लग्नाची मागणी घातली. लग्नही झाले. पती एका खासगी नोकरीत आहेत. पुण्याला ती स्थायिक झाली. यावेळी तिचे पती तिच्या पाठीशी ठाम राहिले. तुला पोलीस भरती मध्ये जायचं आहे ना माझं पूर्ण सहकार्य आहे. त्याच्या पाठिंब्यावर तिने पुन्हा सरावाला सुरुवात केली. सकाळी उठल्यानंतर धावणे, गोळा फेक, टायमिंग लावून धावणे यावर फोकस केला होता. रत्नागिरीच्या २०२२ च्या पोलीस भरतीत भरतीत सिलेक्ट झाली. तिच्या सासरच्या आणि माहेरच्या घरात आनंदाचे वातावरण् होते. शेवटी ट्रेनिंग साठी जावं लागलं. ट्रेनिंग दरम्यान खूप त्रास होत होता. तिला सहन होत नव्हतं. सोडून द्यावं आणि जावं घरी अशा स्थितीत होती. तिने पतीला याबाबत सांगितले. मात्र पतीने तिला धीर दिला. एवढ्या मोठ्या प्रयत्नांनी तू इथपर्यंत पोचली आहेस. आता थोडा त्रास सहन करावा लागेल. एकदा ट्रेनिंग संपल की तुझा त्रास सुटला. हीच तुझी खरी परीक्षा आहे. हे सांगितल्यावर तिला धीर मिळाला. ती आणखी उत्साहाने ट्रेनिंग मध्ये सामील झाली. आणि ट्रेनिग संपून ती बारामती येथील पोलीस मुख्यालयात तिला पोस्ट मिळाली.

# ठाण्यातून दिघेसाहेबांचे अस्तित्व पुसण्याचे षड्यंत्र कोण करतंय?

## टीएमसीला प्रवेश द्वाराच्या निर्मितीला मुहूर्त मिळेना, केदार दिघेंचा आरोप

**ठाणे:** जवळपास दीड वर्षे झाले धर्मवीर आनंद दिघे प्रवेशद्वार उभारण्यास दुर्लक्ष केले जात असून ठाण्यातून दिघे साहेबांचे अस्तित्व पुसण्याचे काम महापालिकेकडून होत असल्याचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी केला आहे. महापालिकेच्या माध्यमातून जरी हे होत असलं तरी यामागे कोणाचं अदृश्य हात आहे आणि कोणाचं हित साधलं जातंय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

दिवंगत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या नावाने असलेला प्रवेशद्वार वर्षाभरापूर्वी महापालिकेने काढला, मात्र वर्षे उलटूनही त्या ठिकाणी नव्याने प्रवेशद्वार उभारण्याचे काम महापालिका करत नसल्याने यामागे नेमका उद्देश काय असा सवाल केदार दिघे यांनी विचारला आहे. दिघे यांचे अस्तित्व ठाण्यातून पुसण्याचे काम कोण करत आहे का याचे उत्तर आता टीएमसीने द्यावे असे दिघे यांनी म्हटले आहे. प्रशासनाकडून ठाण्यात दिखाव्यासाठी वरवर रंगरंगोटी करत आहेत, दीपस्तंभ उभे करत आहेत मग आनंद दिघे यांच्या प्रवेशद्वाराचे वावडे का आहे हे स्पष्ट करावे. खरतर महापालिका प्रशासनाने तातडीने दिघे यांच्या नावाने असणारे प्रवेशद्वार उभारायला हवे होते मात्र यामध्ये होणारी दिरंगाई चिंताजनक आहे असेही दिघे यांनी म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४



www.diwanews.com

# शिवसेनेचे उमेश भगत व दीपाली भगत यांच्या वतीने महिलांचा सन्मान



















**दिवा:–** खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यावतीने बचतगटातील महिलांना महिलादिना निमित्ताने किराणा किट वाटून त्यांचा केला सन्मान करण्यात आला.शनिवार रोजी,आकांक्षा हॉल, बी.आर.नगर ठाणे जिल्हा,दिवा (पूर्व) येथील मंगल कार्यालयात माजी नगरसेविका सौ.दिपाली भगत,विभाग प्रमुख उमेश अशोक भगत यांच्या पुढाकारातुन महिला बचत गटांना खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या वतीने महिला दिना निमित्ताने किराणा किट देऊन,महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला समाज सेविका अर्चना निलेश पाटील,ॲड.सुप्रिया भगत,रेश्मा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.समाजसेविका अर्चना पाटील यांनी उपस्थित महिलांना शासनाच्या योजनांची माहिती दिली. तर निशाताई यादव यांनी बचतगटाचे महत्त्व महिलांना समजावून सांगितले.बाबासाहेब गेंगे यांनीहि माई आणि गाई यांच्या वर प्रबोधनात्मक गीत गाईले.तर पौर्णिमाताई उघाडे यांनीहि मनोरंजनाच्या माध्यमातुन प्रबोधनात्मक एकपात्री नाटकाचा प्रयोग करून,सर्वांची मने जिंकली. नगर सेविका दिपालीताई भगत यांनीहि आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले की,महिलांनी बचतगटाच्या माध्यमातुन आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे. पुढे दिपालीताई म्हणाल्या की,शिवसेना हि नेहमीची दिव्यातील नागरीक समस्या सोडविण्यास कार्यशिल राहिली आहे आणि या पुढेहि राहणार.


दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी
आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ११ मार्च २०२४
पान : ८
www.diwanews.com



## ठाण्यात कचऱ्याला आग

**ठाणे :** कोपरी पूर्व येथील कन्हैया नगर या ठिकाणी असलेल्या एसटीपी प्लांट जवळील कचऱ्याला आग लागल्याची घटना नुकतीच समोर आली. ही आग जवळपास अर्धा तासात नियंत्रणात आणण्यात अग्निशामन दलाच्या जवानासह आपत्ती व्यवस्थापन कक्षेला यश आले. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आर्यन कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि अग्निशमन दल यांनी धाव घेतली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही.

# लोकनेते शैलेश पाटील यांच्या वतीने महिला दिनानिमित्त २० महिलांना लकी ड्रॉच्या माध्यमातून मोफत रिक्षा



**दिवा:**–जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिवा शहरातील महिलांसाठी स्वयंरोजगार निर्माण व्हावा या उद्देशाने शिवसेना उपशहर प्रमुख लोकनेते शैलेश पाटील यांच्या वतीने २० रिक्षांचे वाटप करण्यात आले आहे.

दिवा शहरातील महिलांना स्वयंरोजगारासाठी रिक्षा वाटप करण्याचा उपक्रम लोकनेते शैलेश पाटील यांनी आयोजित केला असून या उपक्रमांतर्गत शहरातील २० महिलांना वीस रिक्षांचे वाटप करण्यात आले.




# मनसे तर्फे दिव्यातील महिलांचा सन्मान





**महाराष्ट्र नवनिर्माण सेना –दिवा शहर तर्फे महिला दिनाच्या निमित्ताने समाजात आपल्या स्वत:च्या मेहनतीने, न डगमगता भरीव कामगिरी करून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करणाऱ्या महिलांना महिला शक्ती सन्मान–२०२४ हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**





